HMAR
-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

## International Research Journal

UGC-CARE LISTED

**Special Issue, Volume-III**

**Sustainable Development and Environmental Issues**



October 2021



**Chief Editor:**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**



**Executive Editor:**
**Dr. Y. M. Chavan**
I/C Principal
Sahakarbhushan S. K. Patil College,
Kurundwad




**Co-Editor:**
**Prof. R. S. Kadam**

**Address**
**'Pranav', Rukmenagar,**
**Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)**

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

**UGC CARE LISTED JOURNAL**

**October 2021**

**Special Issue, Volume-III**

**On**

## *SUSTAINABLE DEVELOPMENT AND ENVIRONMENTAL ISSUES*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Dr. Y. M. Chavan**
I/C Principal
Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad.

**Co-Editor**
**Prof. R. S. Kadam**
Head Dept. of Geography
Vice Principal / IQAC Coordinator

**Editorial Board**
Assi. Prof. S. B. Dongle
Assi. Prof. Y. B. Badame
Assi. Prof. P. A. Hulwan
Assi. Prof. D. T. Hujare
Assi. Prof. A. V. Patole

**Published by-** Dr. Y. M. Chavan, I/C Principal, Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad.

*The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.*

**© All rights reserved with the Editors Price:Rs.1000/-**



CamScanner

**CONTENTS**


| Sr. No | Title | Page No |
|---|---|---|
| 1. | शाश्वत विकास आणि राजकीय व्यवस्था<br>प्रा. डॉ. अतुल हणमंत कदम | 1-3 |
| 2 | वर्तमान परिवेश में नगरीय एवं ग्रामीण विद्यार्थियों की पर्यावरण शिक्षा के प्रति जागरूकता के प्रभाव का अध्ययन<br>बृजेश सिंह | 4-9 |
| 3 | निर्वनिकरण<br>प्रा. डॉ. महेंद्र केरबा गजधाने | 10-12 |
| 4 | भूक आणि अन्नसुरक्षा<br>प्रा.के.एस.तिडके | 13-17 |
| 5 | पर्यावरण रक्षणाच्या भारतातील चळवळी<br>डॉ. मेघराज एकनाथ औटी | 18-19 |
| 6 | चिंतेवर योगाचा प्रभाव<br>प्रदिप सुरेश पांढरे | 20-22 |
| 7 | विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरूस्ती वर कोविड १९ च्या परिणामाचा अभ्यास<br>प्रदिप सुरेश पांढरे | 23-26 |
| 8 | गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील जैवविविधता<br>डॉ. अरुणा बावनकर | 27-30 |
| 9 | आदिवासी उपयोजनांतर्गत लाभ व आदिवासी जमातींचे बदलते अर्थकारण (विशेष संदर्भ - हिंगोली जिल्हा)<br>जयपाल लालु राठोड | 31-36 |
| 10 | भारतीय शेतीचे बदलते स्वरूप व वैशिष्ट्ये<br>डॉ.गजानन बापुराव ठाकरे | 37-41 |
| 11 | भारतीय शिक्षा के इतिहास में 'राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०'देश के भविष्य के विकास के लिए एक महान दृष्टि क्यों ?<br>नितेश कुमार मौर्य | 42-48 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेआर्थिक तत्वज्ञान कोरोनाच्या साथीतही प्रेरणादायी<br>डॉ. विजयकुमार वावळे | 49-51 |
| 13 | शाश्वत विकास व पर्यावरण : एक आर्थिक अध्ययन<br>प्रा.डॉ. अमोल गिरिधरराव आवंडकर | 52-54 |
| 14 | लोकसंख्या, षाष्वत विकास आणि पर्यावरणीय समस्या<br>प्रा.डॉ. विठ्ठल निळकंठ ठावरी | 55-57 |
| 15 | मध्ययुगीन दौलताबाद किल्ल्यातील जलव्यवस्थापण<br>प्रा.डॉ. नथ्थु सिताराम गिरडे | 58-61 |
| 16 | पर्यावरणीय तत्त्वज्ञानाचे स्वरूप<br>डॉ. संदिप जोतिराम भुयेकर | 62-65 |
| 17 | सहकारी पाणी उपसा संस्था आणि बदलती आव्हाने: मौजे आरे व कारभारवाडी ता. करवीर जि. कोल्हापूर गावांचा सुक्ष्म अभ्यास<br>प्रा.डॉ. नेताजी महादेव पाटील | 66-72 |

# भूक आणि अन्नसुरक्षा

**प्रा.के.एस.तिडके**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
पिंपळगांव (बसवंत) ता निफाड. जि नाशिक

**गोषवारा :**

ग्लोबल हंगर इंडेक्स २०२० नुकताच प्रसिद्ध झाला असून चिंतेत टाकणारी माहिती त्यातून समोर आली आहे.जागतिक पातळीवर भूक निर्देशांकाच्या यादीत भारत ९४ व्या स्थानावर आहे.आश्चर्याची बाब म्हणजे आपल्या शेजारचा देश पाकिस्तान आपल्यापेक्षा बराच वर असून जागतिक भूक निर्देशांकाच्या यादीत तो ८८ व्या स्थानावर आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२० हा अहवाल कन्सर्न वर्ल्ड वाईड आणि वेल्ट हंगर हिल्फी या संस्थांनी संयुक्तपणे प्रसिद्ध केला आहे. या अहवालामध्ये ही माहिती समोर आली आहे.या अहवालात एकूण ११७ देशांचा अभ्यास करण्यात आला. देशातील भूकबळी,उपासमारीच्या आधारावर ११७ देशांची यादी यामध्ये केलेले आहे. उपासमारीच्या दृष्टीने ११७ देशांच्या यादीत भारताचा क्रमांक ९४ आहे तर पाकिस्तान मध्ये आपल्यापेक्षा कमी उपासमार असल्याचे समोर आले आहे.ग्लोबल हंगर इंडेक्स मध्ये पाकिस्तान ८८ व्या स्थानावर आहे. तसेच चीनची लोकसंख्या भारतापेक्षा जास्त असूनही चीनने टॉप १७ देशांमध्ये स्थान मिळवले असून चीनमध्ये भूकबळी तसेच उपासमारीचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसते. भारतात एकूण लोकसंख्येपैकी १४ टक्के लोकसंख्या कुपोषणग्रस्त आहे.तसेच पाच वर्षापेक्षा कमी वय असताना मुलांच्या मृत्यूचे प्रमाण हे ३.७ टक्के आहे. भारतात उपाशी राहणारे तसेच भुकेमुळे जीव गमावणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. या सर्व कारणांमुळे ग्लोबल हंगर इंडेक्स मध्ये भारताला गंभीर देशांच्या यादीत टाकण्यात आले आहे. देशात राबवल्या जाणाऱ्या योजनांची अंमलबजावणी योग्य आणि प्रभावी पद्धतीने होत नसल्याने भारताची स्थिती गंभीर बनली आहे. उपोषणा सारख्या गंभीर समस्येशी दोन हात करण्यासाठी योग्य उपाययोजनांचा अवलंब न केल्यामुळे देशात उपासमारीने मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ होत असल्याचे दिसते. म्हणून संबंधित संशोधनामध्ये भारतातील भुकेची समस्या आणि अन्न सुरक्षिततेच्या दृष्टीने भारतात केले जाणारे प्रयत्न अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनामध्ये केलेला आहे.

**प्रस्तावना :**

भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असला तरी जगातील एक चतुर्थांश लोक भुकेने व्याकूळ राहतात. तर ९० कोटी लोक कुपोषित आहेत. यातील सर्वाधिक कुपोषित आणि अर्धपोटी लोक हे भारतात राहतात. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२० च्या अहवालानुसार मागील वर्षाच्या तुलनेत क्रमवारीतील भारताचे स्थान जरी सुधारले असले तरी शेजारी देश नेपाळ, श्रीलंका, पाकिस्तान, म्यानमार, बांगलादेश, इंडोनेशिया हे देश भारताच्या पुढे आहेत. या देशांची कामगिरी भारतापेक्षा चांगली असल्याचे दिसते आहे. रवांडा, नायजेरिया, अफगाणिस्थान, लिबिया, मोझँबिक यासारखे फक्त १३ देश भारताच्या मागे आहेत. अन्न संघटनेने या वर्षी एक संदेश दिलेला आहे, "२०३० पर्यंत जग भूकमुक्त करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आपले योगदान देऊ शकते. त्यात अन्न वाया घालू नका, कमी साधनसामग्रीच्या साहाय्याने अधिक उत्पादन करा, स्वास्थ्यपूर्ण आहार घ्या आणि जग मुक्त करण्यासाठी प्रयत्न करा शेवटी भुकेलेल्या व्यक्तींचा विचार करणे ही आपली संस्कृती नाही का याचा विचार करणे आवश्यक आहे." देशातील लोकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देणे हे जगातील बहुतेक सर्व विकसनशील देशातील आर्थिक नियोजनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. अन्नधान्याचे केवळ पुरेसे उत्पादन करून भागणार नाही तर पुरेशा उत्पादनाबरोबर समाजातील सर्व लोकांमध्ये ते अन्नधान्याचे वाटप योग्य रीतीने केले जाणे हे आवश्यक ठरते. सर्व प्रगतशील राज्यसंस्थांचे हे आद्य कर्तव्य ठरते. प्रत्येक व्यक्तीच्या अन्नधान्य विषयक किमान गरजा जोपर्यंत भागविल्या जात नाही. तोपर्यंत त्या व्यक्तीला आर्थिक नियोजनाचे महत्त्व वाटणे शक्य नाही. पुरेशा अन्नाच्या अभावी मानवी कल्याण सामाजिक न्याय आणि लोकशाही या गोष्टी प्राप्त करून घेणे भारताला जवळजवळ अशक्य होईल.

**संशोधन समस्या :**

भूक आणि अन्नसुरक्षा यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. अन्न सुरक्षिततेच्या संदर्भात भारत आणि जगातील इतर राष्ट्र यांची तुलना करणे.



CamScanner

२. अन्न सुरक्षिततेच्या बाबतीत मागणी आणि पुरवठा या दोन घटकांच्या संबंधांचा अभ्यास करणे.

३. अन्न सुरक्षितते संदर्भात करण्यात आलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये माहिती संकलनासाठी विविध मासिके, संदर्भ पुस्तके व सांकेतिक स्थळे इत्यादींचा आधार घेण्यात आलेला आहे.

**संशोधन विश्लेषण**

**भारतापुढील अन्न समस्येची कारणे**

भारतातील अन्य समस्येला दोन अंगे आहेत. अन्नधान्य करिता असणाऱ्या मागणीच्या मानाने अन्नधान्याची निरपेक्ष टंचाई आणि अन्नधान्याच्या किंमतीत घडून येणारी भयानक वाढ ही दोन अंगे आहेत.अशा रीतीने संबंध देशांच्या दृष्टीने विचार करता लोकांमध्ये अन्नधान्याचे वाटप करण्यासाठी आवश्यक तेवढ्या अन्नधान्याचा अपुरेपणा हा एक प्रश्न होय आणि भारतातील लोकांच्या दृष्टीने अन्नधान्याच्या उच्च पातळीवरील किमती हा दुसरा प्रश्न ठरतो. अन्नधान्याच्या उत्पादनावर आणि अन्नधान्याच्या किंमतीवर परिणाम करणारे घटक पुढील तीन गटात विभागता येते. अन्नधान्यात करिता मागणीवर परिणाम करणारे घटक अन्नधान्याचा पुरवठा व परिणाम करणारे घटक आणि अन्न समस्ये वर परिणाम घडवून आणणारे शासकीय धोरण यासारखे घटक यामध्ये समाविष्ट करता येतात. भारतात अन्नधान्य करिता असणाऱ्या मागणीवर परिणाम करणारे घटक अन्नधान्याकरिता मागणी सातत्याने वाढत राहण्यास आणि परिणामतः अन्नधान्याच्या किमतीत वाढ घडून येण्यास खालील घटक प्रामुख्याने जबाबदार आहेत.

**१. वाढती लोकसंख्या :**

भारताच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. सन १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. १९७४ मध्ये ती ५८ कोटी पर्यंत वाढली. सन १९९१ मध्ये ८५ कोटी पर्यंत वाढली. सध्या भारताच्या लोकसंख्येतील वार्षिक वाढीचा दर सुमारे २.५ टक्के आहे.याचा अर्थ भारताच्या लोकसंख्येत दरवर्षी सुमारे १.५ कोटी लोकांची भर पडते. भारताच्या लोकसंख्येत सातत्याने घडून येणाऱ्या या वाढीमुळे अन्नधान्य करता मागणी सतत वाढत आहे. म्हणजेच १९५१ पासून भारतात अन्नधान्य उत्पादनात सातत्याने वाढ होत असली तरीही अन्नधान्याची किंमत पातळी सातत्याने उंचावत आहेत.

**२. शहरीकरणात वाढ :**

भारताचे जलद औद्योगिकरण घडवून आणण्यासाठी केल्या गेलेल्या उपाययोजनांमुळे भारतात शहरीकरण वाढत चाललेले आहे. शहरी भागातील लोकांचे उत्पन्न पातळी सापेक्षतेने अधिक उच्च आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्य करता मागणी सतत वाढत चाललेली दिसून येते.

**३. मागणीची उच्च उत्पन्न लवचिकता :**

भारतातील बहुसंख्य लोकांचे राहणीमान अतिशय खालच्या पातळीवर आहे. स्वाभाविकच त्यांची अन्नधान्य करिता मागणीची उत्पन्न लवचीकता उच्च आहे. याचा अर्थ असा की सरकारने योजलेल्या समाजवादी उपायांमुळे किंवा देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या औद्योगिकरणाचा कार्यक्रमांमुळे लोकांच्या उत्पन्नात कशी वाढ होत आहे, तसा ज्यादा उत्पन्नातील अधिकाधिक भाग अन्नधान्याच्या खरेदीसाठी खर्च केला जात असून अन्नधान्य करिता मागणी सतत वाढत आहे.

**४.लोकांच्या अन्नविषयक सवयी :**

भारतातील लोकांच्या आहारात प्रामुख्याने अन्नधान्य व डाळी यांचा समावेश आहे.मांस,मासळी, फळे, दुधाचे पदार्थ वगैरे वस्तू महाग असल्याने किंवा भारतातील बहुसंख्य लोकांना अशा वस्तूंच्या उपभोगाची सवय नसल्यामुळे भारतातील लोकांच्या नेहमीच्या अन्नात या वस्तू कमी प्रमाणात आढळतात. स्वाभाविकच सर्व प्रकारच्या अन्नधान्य करता मागणी सतत आणि वेगाने वाढत राहते.

**५. नियोजन काळातील वाढती गुंतवणूक :**

भारतातील पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाल्यापासून आजपर्यंत एकूण गुंतवणुकीत फार वाढ घडून येत आहे. अशारीतीने १९५३-५४ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील वार्षिक गुंतवणूक सुमारे १४० कोटी रुपये होती. चौथ्या योजनेच्या काळात अशा गुंतवणुकीचा वार्षिक दर सुमारे तीन हजार कोटी होता. पाचव्या सहाव्या व सातव्या योजनेत सार्वजनिक गुंतवणूक अनुक्रमे ३९,३०० कोटी रुपये ९७,५०० कोटी रुपये व १,८०,००० कोटी होती. स्वाभाविकच गुंतवणुकीतील वाढीमुळे लोकांची पातळी उंचावत आहे. त्यामुळे अन्नधान्य करता असणाऱ्या मागणी दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**६. सट्टेबाजी :**

सन १९५६ पासून अन्नधान्याच्या किमती सातत्याने वाढत आहेत आणि अन्नधान्याच्या किमती आणखी वाढतील अशी घाऊक व्यापारी व किरकोळ व्यापार यांची इच्छा असते. त्यामुळे अन्न धान्याची साठवणूक करण्याची व त्या अन्नधान्याच्या किमती आणखी वाढेपर्यंत ते अन्नधान्य आपल्याजवळ राखून ठेवण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती या घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांमध्ये दिसून येते. त्यातून अन्नधान्याच्या किंमतीत आणखी वाढ होण्यास प्रोत्साहन मिळते.

**७. तुटीचा अर्थभरणा :**

गुंतवणूक वाढीसाठी आवश्यक असणारी वित्त साधनसामग्री जादा कर आकारणीच्या मार्गाने मिळविता आली असती तर अन्नधान्य करता असणाऱ्या मागणीतील ताण तिथे मोठ्या प्रमाणात वाढला नसता. पण प्रत्यक्षात बरीचशी गुंतवणुकी तुटीचा अर्थभरणाच्या मार्गाने केली जात आहे. याचा अर्थ पैशाच्या निर्मितीच्या मार्गाने ही गुंतवणूक केली गेली. तुटीचा अर्थभरणा केल्यामुळे सर्वसाधारण किंमत पातळीत आणि विशेषता अन्नधान्याच्या किंमत पातळीत सतत वाढ घडून येत आहे.

**८. पतपैशाच्या पुरवठ्यात वाढ :**

लोकांजवळील पैशाच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने सर्व प्रकारच्या वस्तू करता मागणी आणि अन्नधान्य करता असणाऱ्या मागणीची उत्पन्न लवचिकता अधिक असल्याने विशेषता अन्नधान्य करता मागणी वाढत आहे. भारतातील सर्व अनुसूचित बँकांनी निर्माण केलेला पतपैसा सन १९५१ मध्ये ५८० कोटी रुपये होता. ऑगस्ट १९७५ मध्ये हा पत पैसा मोठ्या प्रमाणावर वाढला. लोकां जवळील पैशाचा एकूण पुरवठा वेगाने वाढल्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीत भरमसाठ वाढ झालेली दिसून येते.

**अन्नधान्याच्या पुरवठा बाजूवर परिणाम घडवून आणणारे घटक**

अन्नधान्याच्या किमती मध्ये वाढ घडवून आणण्याच्या बाबतीत अन्नधान्य करता असणाऱ्या मागणीच्या बाजूवर परिणाम घडवून आणणारे घटक जितके महत्त्वाचे ठरतात तितकेच अन्नधान्याचा पुरवठा बाजूवर परिणाम घडवून आणणाऱ्या घटक देखील महत्त्वाचे ठरतात, हे घटक खालील प्रमाणे

**१. अन्नधान्याच्या उत्पादनातील वाढीचा दर :**

अन्नधान्य करता असणाऱ्या मांडणीत फार मोठ्या वेगाने वाढ घडून येत असताना अन्नधान्याच्या उत्पादनात व पुरवठ्यात मात्र त्यामानाने बरीच अल्प वाढ घडून येत आहे अन्नधान्याच्या उत्पादनात सतत चढ-उतार घडून येत असून भारतातील शेती व्यवसाय प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे भारतातील पाऊस आपल्या लहरीपणा बद्दल प्रसिद्ध आहे त्यामुळे कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ पडतो आणि त्याचा परिणाम अन्नधान्य उत्पादनामध्ये घट भरून येते सन १९६४-६५ मध्ये गाठी गेलेली एकूण ९० दशलक्ष टनांची पातळी गाठण्यासाठी भारताला पुढे अनेक वर्षे लागली.

**२. असमाधानकारक विक्री व्यवस्था :**

अपुरी आणि असमाधानकारक रस्ते अपुऱ्या साठवणूक सोय यामुळे आणि अन्य अनेक घटकांमुळे अन्नधान्याच्या विक्री व्यवस्थेत अडचणी निर्माण होत असतात अन्नधान्याची विक्री व्यवस्था अपुरी आणि असमाधानकारक असल्याने गहू तांदूळ यासारख्या आनंदाने पिकांच्या किमती निरनिराळ्या भागात निरनिराळ्या आढळतात. अशा रीतीने असमाधानकारक विक्री व्यवस्था हेही एक अन्नधान्याच्या किंमत वाढीचे महत्त्वाचे कारण आहे.

**३. अन्नधान्याची नासाडी :**

भारतात झाडीमुळे प्रतिवर्षी अन्नधान्याची नासाडी मोठ्या प्रमाणावर होते.उंदिर, माकडे, टोळ व अन्य वन्य प्राण्यांकडून तसेच कीटकांकडून सुमारे १० ते १५ टक्के अन्नधान्याची नासाडी केली जाते. व परिणामता अन्नधान्याचा पुरवठा त्या प्रमाणात कमी होतो.



CamScanner

**४. विकलेला वाढावा :**

अन्नधान्याच्या एकूण उत्पादनात वाढ घडून असल्याचे दिसून येत असली तरी सर्व विक्रेय वाढावा बाजारात विक्रीसाठी आणला जात नाही. भारतातील शेतकऱ्यांकडून बराचसा शेतमाल हा कुटुंबातील सदस्यांच्या उपभोगासाठी राखून ठेवला जातो आणि उरलेल्या मालाची बाजारामध्ये विक्री केली जाते तसेच अन्नधान्याच्या किंमती भविष्यकाळात वाढतील या अपेक्षेने बरेच शेतकरी झालेल्या उत्पादनापैकी काही उत्पादन राखून ठेवतात, त्याचा साठा करतात. आणि त्यामुळे प्रत्यक्ष बाजारामध्ये जास्त पुरवठा विक्रीसाठी आणला जात नाही. त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किंमती वाढतात.

**५. आयात :**

अन्नधान्याची आयात केल्यास अन्नधान्याचा पुरवठा वाढणे शक्य असते. सार्वजनिक कायदा ४८० योजनेनुसार स्वस्त दराने अन्नधान्याची आयात होत होती. तोपर्यंत अन्नधान्याचा पुरेसा पुरवठा होऊ शकत होता आणि त्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीत फारशी वाढ झाली नाही. पण सन १९७० नंतर अन्नधान्याच्या पुरवठ्याच्या बाबतीतील जागतिक परिस्थिती देखील काही प्रमाणात बिघडली असून आता परकीय देशांकडून सवलतीच्या दरात अन्नधान्य मिळणे कठीण झाले आहे. अन्नधान्याची आयात आता महाग झाली आहे.

**६. सरकारचे अन्नविषयक धोरण :**

भारतातील अन्नधान्याच्या किंमती वाढण्यात सरकारने वेळोवेळी अवलंबलेले सदोष स्वरूपाचे अन्नधान्य विषयक धोरणही मोठ्या प्रमाणावर जबाबदार ठरले आहे. भारतात आजपर्यंत अन्न विषयक धोरणाची अंमलबजावणी योग्यरीतीने झालेली दिसून येत नाही. अन्नविभागाची निर्मिती, अन्नधान्याच्या आधी प्राप्तीच्या अनाकर्षक स्वरूपाच्या किमती, योग्य रीतीने आखलेल्या अन्न विषयक धोरणाचा अभाव, भारताच्या अन्न महामंडळाकडून अन्नधान्याच्या बाबतीत गैरव्यवस्था, अपुरी व अकार्यक्षम स्वरूपाची सार्वजनिक वाटपपद्धती, वजनदार जमीन मालकांकडून सरकारवर आणले जाणारे दडपण, भ्रष्ट प्रशासन या अशा सर्व कारणांमुळे अन्नधान्याच्या मूळच्या टंचाईत अन्नधान्याच्या कृत्रीम टंचाईची भर पडते आणि त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किमती वाढत आहे..

**अन्नसमस्या सोडवण्यासाठी उपाय योजना :**

भारतातील अन्न समस्या मूलभूत स्वरूपाची असून ही समस्या सोडवण्यासाठी दीर्घकालीन स्वरूपाचे धोरण अवलंबले जाणे आवश्यक आहे. अर्थात शासन अशा प्रकारच्या काही उपाय योजना करीत आहे. पण खालील बाबतीत प्रकर्षित पद्धतीने प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे.

**अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी उपाय योजना :**

भारताचे अन्न समस्या सोडवण्यासाठी भारतातील अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये प्रतिवर्षी ५ टक्के ते ६ टक्के दराने वाढ घडवून आणणे हा अंतिम तोडगा होय. भारतातील अन्नधान्याच्या उत्पादनाचा दर वाढवण्यासाठी सुधारित बी-बियाणे, सिंचनाच्या सुविधा, खते, जंतुनाशक औषधे, योग्य स्वरूपाची शेतकरी अवजारे, वगैरे गोष्टींवर भर देऊन अन्नधान्य उत्पादनात वाढ घडवून आणणे शक्य आहे. सहकारी पतपेढ्या ग्रामीण बँक शेतमाल विक्री संस्था नव्या शेतकी ज्ञानाचा व तंत्राचा प्रसार करण्यासाठी विस्तार सेवा, संशोधनासाठी प्रयोगशाळा तसेच शिक्षण प्रशिक्षण केंद्रे यासारख्या संस्था संघटित केल्यास अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ घडवून आणणे शक्य आहे.

**१. अन्नधान्य वितरण व्यवस्था :**

अन्नधान्याच्या बाबतीत घाऊक व्यापार व किरकोळ व्यापार सरकारने ताब्यात घेणे अशक्य व अयोग्य ठरेल. त्याऐवजी भारताचे अन्न महामंडळ, अन्नधान्याचा साठा सबंध भारतभर गोदामांचे जाळे, रास्त किमतीच्या दुकानांची विस्तृत साखळी यासारख्या वाटप यंत्रणेद्वारा अन्नधान्याचे न्याय्य वाटप घडवून आणणे आवश्यक आहे.

**२. योग्य किंमत धोरण :**

शेतमालाच्या किमतीतील हंगामी चढ-उतार टाळणे आणि अन्नधान्याचे अधिक उत्पादन करण्यास शेतकऱ्यांना प्रेरणा मिळेल अशा प्रकारच्या किफायतशीर किमतीत बाजारात राहतील अशी व्यवस्था करणे हे दीर्घकालीन किंमत विषयी धोरणाची उद्दिष्टे असली पाहिजे सतत बदलणाऱ्या किमतीमुळे शेतकऱ्यांना उत्पादन करण्यास प्रेरणा मिळत नाही म्हणून किमतीत सातत्य राहिले पाहिजे.



CamScanner

**३. इतर उपाययोजना :**

भारतातील लोकांच्या उपभोग आकृतिबंधात हळूहळू बदल घडवून आणल्यास भारतातील अन्नधान्यावरील ताण कमी करता येणे शक्य आहे. दुग्धव्यवसाय, मच्छीमारी, फळबाग व्यवसाय, सागरी अन्न गोळा करण्याचा व्यवसाय यासारख्या व्यवसायांचा विकास घडवून आणून पूरक अन्न म्हणून वरील वस्तूंचा अनुभव वाढविता येण्यास भरपूर वाव आहे. अन्नधान्य उत्पादनात आपण कितीही वाढ घडवून आणली तरी प्रतिवर्षी २.५ टक्क्यांनी वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याच्या उपलब्धतेवर सातत्याने फार मोठा ताण पडत राहील.

**निष्कर्ष :**

भारतातील लोकसंख्या वाढीचा दर हा परिणामकारक रीतीने कमी केल्याशिवाय भारताचा अन्न प्रश्न सुटणे अशक्य आहे. लोकांना अन्न समस्येच्या गांभीर्याची नीट जाणीव करून दिली पाहिजे. खेड्यातील बहुतेक लोकांवर अद्याप धार्मिक अंधश्रद्धांचा पगडा असून दैववादाची ग्रामीण समाजावर अध्याप घट्ट पकड आहे. त्यांना शिक्षण दिले गेल्यास आणि अन्न समस्येची व्याप्ती व त्या समस्येचे गांभीर्य त्यांना समजावून दिल्यास ही समस्या सोडविण्याच्या दृष्टीने ते प्रयत्न करू लागतील. लोकसंख्या मर्यादित ठेवण्यास आणि अन्नधान्याच्या उत्पादनात अधिक वाढ घडवून आणण्यास प्रवृत्त होते. लोकशाही टिकून राहण्यासाठी आणि अन्नाचा पुरेसा पुरवठा खरोखरच अत्यावश्यक ठरण्याची शक्यता आहे.

**संदर्भ :**

१. भारतीय अर्थव्यवस्था, डॉ.देसाई सौ.भालेराव, निराली प्रकाशन

२. भारतीय व जागतिक आर्थिक विकास, मुकुंद महाजन, निराली प्रकाशन

३. wwwgoogle.com

४. विकिपीडिया

National Institute of Education, Kurundwad

# Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad

(NAAC Accreditation 'B+' Grade)

*At/Post-Kurundwad, Tal- Shirol Dist- Kolhapur 416106 India (MS), India*

***organized by***

## *One Day Interdisciplinary International e-Conference*

***On***

# SUSTAINABLE DEVELOPMENT AND ENVIRONMENTAL ISSUES

## CERTIFICATE

This is to certify that Prof./Dr./Mr./Ms. Tidake Kiran subhash of MVP's K.K.W. Arts, science & commerce college (P.B.) has participated in One Day Interdisciplinary International e-Conference on ***"Sustainable Development and Environmental Issues"*** organized by the Department of Geography and IQAC Cell of ***Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad*** on ***4th October 2021***, in Virtual mode.

He/She has presented a research paper entitled Hunger and Food safety

*Convener*
***Prof. R. S. Kadam***
***Head Dept. of Geography***
***Vice Principal / IQAC Coordinator***

*Organizing Secretary*
**Dr. Y. M. Chavan**
**I/C Principal**
**Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad**

*Issue of Certificate-04/10/2020*

CamScanner